VOL- IX ISSUE- XII DECEMBER 2022 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 7.331 ISSN 2349-638x

# नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० आणि बदलती शिक्षण प्रणाली एक चिकित्सा

डॉ. संजय कांबळे,
लोकप्रशासन विभाग प्रमुख,
राजर्षी शाहू कला व विज्ञान महाविद्यालय,
वाळूज औरंगाबाद.

**प्रस्तावना :**

भारतीय स्वातंत्र्याचा अमृत मोहत्सवी वर्ष साजरा करत असतानांच भारतीय नागरिकांना अन्न, वस्त्र, निवारा आणि शिक्षण या मुलभूत गरजा आपण २१ व्या शतकात प्रवेश केलेला असला तरी अजूनही पूर्ण झालेल्या नाहीत. यातील शिक्षण ही अशी गरज आहे कि, जी गरज भागवल्यावर माणसाला अन्न, वस्त्र आणि निवारा या गरजांसाठी कोणवर अवलंबून राहावे लागत नाही. फक्त शिक्षण त्या दर्जाचे असायला हवे. म्हणूनच म्हणतात न, 'शिक्षण म्हणजे वाघिणीचे दुध आहे' जो ते प्राशन करतो तो डरकाळी फोडतोच. याउलट शिक्षण हे योग्य दर्जाचे मिळत नसेल किंवा अद्यावत शिक्षण मिळाले नसेल तर त्या शिक्षणाचा फायदा तरी काय ? म्हणून शिक्षण प्रक्रियेत सतत योग्य ते बदल घडून येण आवश्यक असते. शिक्षण ही अखंडपणे बदलत जाणारी एक प्रक्रिया आहे. वरीलप्रमाणे अन्न, वस्त्र, निवारा यांसारख्या अनेक गरजा कालानुरूप बदलत असतात. या गरजा भागवण्यासाठी सक्षम होणे प्रत्येक नागरिकाला गरजेचे असते. यासाठी शिक्षण योग्य पातळीवरचे मिळायला हवे. या अनुशांगाने भारतात झालेले प्रयत्न यांचा आढावा खालीलप्रमाणे घेता येईल.

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर ईस. वी .सन. १९६८ मध्ये देशाचे पहिले शैक्षणिक धोरण इंदिरा गांधी सरकार मध्ये मांडण्यात आले. हे शैक्षणिक धोरण सन १९६४ च्या कोठारी आयोगाच्या शिफारशींवर आधारित होते. तेव्हा १०+२+३ शैक्षणिक प्रणाली स्वीकारण्यात आलेली होती. यासोबत त्रिभाषा सूत्र अवलंबण्यात आलं होतं. यामध्ये प्रथम भाषा मातृभाषा, द्वितीय भाषा राष्ट्रभाषा (हिंदी), तृतीय भाषा म्हणून इंग्रजीचा स्वीकार करण्यात आलेला होता. सर्वसाधारणपणे याच शिफारशींवर आधारित १९८६ मध्ये दुसरे शैक्षणिक धोरण राजीव गांधी सरकारने मांडले. या धोरणामध्ये "विशेषत: भारतीय महिला, अनुसूचित जमाती (अनुसूचित जमाती) आणि अनुसूचित जाती (एससी) समुदायांसाठी असमानता दूर करण्यासाठी आणि शैक्षणिक संधी समान करण्यावर विशेष भर दिला गेला.

भारतात दुसऱ्यांदा राष्ट्रीय शिक्षण धोरण १९८६ मध्ये तयार करण्यात आले आणि १९९२ मध्ये सुधारीत करण्यात आले. तेव्हापासून अनेक बदल झाले आहेत, ज्या धोरणात सुधारणा करण्याची आवश्यकता होतीच. तदनंतर NEP २०२० हे २१ व्या शतकातील पहिले शैक्षणिक धोरण आहे, आणि ते चौतीस वर्ष जुन्या शिक्षणावरील, राष्ट्रीय धोरण (NPE), १९८६ ची जागा घेते. शिक्षणातील प्रवेश, समानता, गुणवत्ता, परवडणारी क्षमता आणि उत्तरदायित्व या मूलभूत स्तंभांवर आधारित हे धोरण आहे, हे धोरण शाश्वत विकासासाठी २०३० च्या अजेंडाशी संरेखित आहे आणि शालेय आणि महाविद्यालयीन शिक्षण अधिक समग्र, लवचिक, बहुविद्याशाखीय, २१व्या शतकातील गरजांना अनुकूल बनवून भारताला एक मजबूत विद्वान समाज आणि जागतिक विद्वान महासत्ता बनवण्याचे उद्दिष्ट आहे. एकूणच २१ व्या शतकातील गरजांसाठी उपयुक्त आणि प्रत्येक विद्यार्थ्यांना अद्वितीय क्षमता विकसित करण्याच्या उद्देशाने हा नवीन शैक्षणिक धोरण पुढे आलेला दिसतो.

**संशोधन पद्धती :**

प्रस्तुत संशोधन करण्यासाठी दुय्यम साधन सामुग्रीचा उपयोग करण्यात आला त्यात प्रामुख्याने दुय्यम स्त्रोताचा आधार घेण्यात आला आहे. विशेषत: शिक्षणा संबंधित आकडेवारी, रिपोर्टस, अभिलेखे, दस्तेवज, दैनिक वृत्तपत्रे,

साप्ताहिके, संदर्भग्रंथ, मासिके, नियतकालिके आणि शासनाशी संबंधित वेबसाईट इत्यादी साधनाचा वापर केलेला आहे.

**संशोधनाचे उद्देश :**

सदरील संशोन करण्याचा उद्देश भारतातील शैक्षणिक धोरणाचा आढावा घेऊन बदलत्या नवीन शैक्षणिक धोरणाची चिकित्सा करणे हा आहे.

१. भारतातील स्वातंत्र्योत्तर सर्व शैक्षणिक धोरणांचा आढावा घेणे.
२. भारतातील शिक्षण प्रणाली आणि रचना अभ्यासाने.
३. नवीन शैक्षणिक धोरण आणि बदलती शिक्षण प्रणाली याची चिकित्सा करणे.

**शिक्षण विषयक घटनात्मक तरतुदी :**

भारतीय राज्यघटनेच्या राज्य धोरणाची दिशानिर्देशक तत्त्वे (Driective Principal of State Policy - DPSP) च्या भाग ४, कलम ४५ आणि ३९ (एफ) मध्ये, राज्य मान्य आणि सर्वांना न्याय्य व प्रवेश-योग शिक्षणाची तरतूद आहे. १९७६ च्या ४२ व्या घटनादुरूस्ती कायद्याने शिक्षणास राज्य यादीतून समवर्ती यादीमध्ये स्थानांतरित केले गेले. २०२२ मधील ८६ व्या घटनादुरूस्तीने मूलभूत अधिकारांच्या कलम २१-ए अंतर्गत शिक्षणाला अंमलबजावणीचा हक्क बनविला. ६ ते १४ वयोगटातील सर्व मुलांना प्राथमिक शिक्षण देण्यासाठी राइट टू एज्युकेशन (आरटीई), २००९ लागू करण्यात आले आहे. या अधिनियमात सर्व शिक्षा अभियान, मध्यान्ह भोजन योजना, नवोदय विद्यालय, केंद्रीय विद्यालय यासारख्या सरकारी उपक्रमांत समाजातील वंचित घटकांसाठी २५% आरक्षण देण्यात आले आहे.

**नवीन शैक्षणिक धोरण : घटहनिहाय पॅटर्न**

१. **फाऊंडेशन :** वयवर्ष तीन ते सातसाठी - मातृभाषेमध्ये शिक्षण - त्यात नर्सरी, ज्युनिअर केजी, सिनिअर केजी, पहिली, दुसरी अशी एकूण पाच वर्षे प्रामुख्याने बालकाला मेंदू विकासाच्या गतीने शैक्षणिक अनुभव देणे. वयवर्ष सहापर्यंत बालकाचा मेंदू विकास ८५ टक्क्यांपर्यंत पूण होतो, असे मेंदूशास्त्र सांगते. त्यामुळे बालकाचा बौद्धिक, शारीरिक, सामाजिक, भावनिक, मानसिक विकास चांगला होण्यास मदत होईल.
२. **प्राथमिक शिक्षण :** वयवर्ष आठ ते दहासाठी येथे बालकांच्या अध्ययनविषयक कौशल्यांचा विकासवर भर दिला जाईल. इयत्ता तिसरी ते पाचवी.
३. **मीडल स्टेज स्कूल :** वयवर्ष ११ ते १३ साठी व्यावसायिक व कौशल्यावर आधारित शिक्षण व 'इंटर्नशिप'ची सोय, किमान एका तरी कौशल्यावर प्रभुत्व प्राप्त करून देणे - इयत्ता सहावी ते आठवी. लहानपणापासून मुलांच्या व्यावसायिक कौशल्यांचा कसा विकास होईल, याची संकल्पना या धोरणात मांडण्यात आली आहे.
४. **सेकंडरी स्कूल :** वयवर्ष १४ ते १७ साठी नववी ते बारावी. यात प्रत्येकाला आपल्या आवडीचे हवे ते विषय निवडण्याचे स्वातंत्र्य आहे.

अशा प्रकारे आजघडीला नवीन शैक्षणिक धोरणानुसार शिक्षण प्रणालीत जे बदल अपेक्षित आहेत अथवा त्याची रचना कशी असणार आहे त्यांचे विवरण खालील मुद्यांमधुन अधिक स्पष्ट होईल.

**नवीन शैक्षणिक धोरणाची पार्श्वभूमी:**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणांतर्गत शाळा-महाविद्यालयांमधील शिक्षणाचं धोरण तयार केले जाते. भारत सरकारने नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० लॉंच केले आहे. केंद्र सरकारने शैक्षणिक धोरणात अनेक मोठे बदल केले आहेत. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाद्वारे भारताला जागतिक विद्वान महासत्ता बनवणे. आता मनुष्यबळ व्यवस्थापन मंत्रालय हे शिक्षण म्हणून ओळखले जाईल. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणांतर्गत, २०२३ पर्यंत शालेय शिक्षणात १००% GER सह प्रीस्कूल ते माध्यमिक शाळेपर्यंत शिक्षणाचे सार्वत्रिकरण केले जाईल (वैद्यकीय आणि कायद्याचा अभ्यास समाविष्ट नाही.) या आधी १०+२ चा पॅटर्न पाळला जात होता, पण आता ५+३+३+४ हा नवीन शिक्षण पॅटर्न धोरणानुसार फॉलो केला जाईल. २०१४ च सार्वत्रिक निवडणुकीत भारतीय जनता पक्षाच्या जाहीरनाम्यात या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचा समावेशर करण्यात आला होता.

सन २०१५ मध्ये स्मृती इराणी मनुषबळ विकास मंत्री होत्या त्यांनी नव्या शैक्षणिक सुधारणा मान्य करण्याच्या दृष्टिकोनातून ऑक्टोबर २०१६ मध्ये धोरण मांडले. यावर जनतेकडून सुधारणा मागवण्यात आल्या. मात्र हे धोरण मंजूर होऊ शकले नाही. या धोरण निर्मितीचे प्रमुख टी.एस.आर. सुब्रमण्यम हे होते. **नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०** धोरण पुन्हा दुसरा प्रयत्न माजी इस्त्रो अध्यक्ष के. कस्तुरीरंगन यांच्या अध्यक्षतेखाली कमिटी बनवून करण्यात आला.

**नवीन शैक्षणिक धोरणाचे महत्वाचे मुद्दे**

"भारताला जागतीक ज्ञान महासत्ता" बनविणे हे **नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०** चे अंतिम उद्दिष्ट आहे.

- मनुष्यबळ विकास मंत्रालयाचे नाव बदलून शिक्षण मंत्रालय ठेवले गेले.
- १९४७ मध्ये स्वातंत्र्य मिळाल्यापासून भारतातील शिक्षण प्रणालीतील हा तिसरा मोठा बदल आहे.
- एनईपी २०२० च्या पूर्वी १९६८ आणि १९८६ मध्ये शैक्षणिक यंत्रणेत सुधारणा झाली.
- शालेय शिक्षणातील गुंतवणुकीमध्ये लाक्षणिक वाढ करणे नवनवीन उपक्रम राबविणे.
- इसवी सन २०२५ पर्यंतपाचवी व त्यापुढील इयत्तेतील प्रत्येक विद्यार्थ्यांस पायाभूत सक्षरता व तंत्रज्ञान आत्मसात होत असल्याची दक्षता घेणे.
- शालेय शिक्षणासाठी ५+३+३+४ रचनेवर आधारित बौद्धिक विकास व अध्ययनाच्या तत्त्वांवर आधारित अभ्यासक्रम व अध्यापन शास्त्र रचना विकसित करण्यात आली आहे.

**नॅशनल रिसर्च फाउंडेशन**

नवसंशोधनाच्या कल्पना वेगाने देशभर वितरीत व्हाव्यात यासाठी नॅशनल रिसर्च फाउंडेशनची स्थापना करण्यात येईल. या धोरणाच्या माध्यमातून सर्वच भारतीयच भाषांचे संवर्धन वृद्धी व चैतन्य अबाधीत राहील.

**राष्ट्रीय शिक्षण रचना व आयोग**

राष्ट्रीय शिक्षण आयोग पंतप्रधानांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय शिक्षण आयोग किंवा नॅशनल एज्युकेशन कमिशन ची स्थापना करण्यात येईल. हा आयोग भारतीय शैक्षणिक दूरदृष्टीचा परिरक्षक असेल. सन २०३० पर्यंत पूर्व-शाळा ते माध्यमिक स्तरापर्यंतचे शिक्षण १००% ग्रॉस एनरोलमेंट रेश्यो (जीईआर) सह सार्वत्रिक केले गेले आहे. १०+२ ची सद्य शिक्षण प्रणाली नवीन व सुधारित ५+३+३+४ रचनेद्वारे अनुक्रमे ३-८, ८-११, ११-१४, आणि १४-१८ वयोगटातील परस्पर बदलती जाईल. या प्रणालीमध्ये १२ वर्षांचे शिक्षण तीन वर्षे अंगणवाडी/पूर्व-शालेय शिक्षणासह असेल.

इयत्ता दहावी आणि बारावीच्या बोर्ड परीक्षा अधिक सुलभ केल्या जातील आणि तथ्ये शिकण्याऐवजी मुख्य कार्यक्षमतेवर अधिक भर दिला जाईल. सर्व विद्यार्थ्यांना या परीक्षा दोनदा घेण्यास परवानगी दिली जाईल. शाळांमधील शैक्षणिक प्रवाह. अवांतर क्रिया आणि व्यावसायिक प्रवाह यांच्यात कोणतेही कठोर वेगळेपणा असणार नाही. इयत्ता सहावीपासून इंटर्नशिपसह व्यावसायिक शिक्षणाची तरतूद मातृभाषा / प्रादेशिक भाषा ५ वी पर्यंत शिक्षण देण्यासाठी वापरली जाईल आणि कोणत्याही विद्यार्थ्यांवर कोणतीही भाषा कठोरपणे लादली जाणार नाही. शिक्षकांसाठी राष्ट्रीय शैक्षणिक अभ्यासक्रम (एनसीटीई) एनसीईआरटीशी सल्लामसलत करून राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषद (एनसीटीई) द्वारा प्रोग्राम केले जाईल. ४ वर्ष एकात्मिक बी.एड. २०३० पर्यंत पदवी अभ्यासक्रम अध्यापनासाठी किमान पदवी पात्रता असेल.

**उच्च शिक्षण :**

अंडरग्रेजुएट कोर्स ३ ते ४ वर्षांच्या लवचिक अभ्यासक्रमासह एकाधिक एक्झिट ऑप्शन्ससह आणि वेगवेगळ्या स्तरावर प्रमाणपत्रांसह दिले जातील. एम.फिल अभ्यासक्रम बंद केले जातील. वैद्यकिय आणि कादेशीर शिक्षण वगळता संपूर्ण उच्च शिक्षणासाठी **'उच्च शिक्षण आयोग'** Higher Education Commission of India (HECI) (एचईसीआय) ची स्थापना केली जाईल. सार्वजनिक आणि

खाजगी दोन्ही उच्च शिक्षण संस्था समान निकषांद्वारे संचालित केल्या जातील एचईसीआय मध्ये चार स्वतंत्र विभाग असतील उदा.

१) नियामक चौकटीशी देखभाल करण्यासाठी राष्ट्रीय उच्च शिक्षण नियामक परिषद (एनएचईआरसी).
२) सर्वसाधारण शैक्षणिक परिषद (जीईसी) मानक सेटिंग्ज देखरेखीसाठी.
३) वित्तपुरवठा करण्यासाठी उच्च शिक्षण अनुदान (एचईजीसी).
४) अधिकृत मान्यता मिळवण्यासाठी नॅशनल क्रिडिटी कौन्सिल (एनएसी) १५ वर्षात महाविद्यालयांची संलग्नता प्रणाली पुसून टाकली जाईल आणि महाविद्यायांनी श्रेणीबद्ध स्वायत्तता देण्याची यंत्रणा राबविली जाईल. भविष्यात प्रत्येक महाविद्यालयाचा स्वायत्त पदवी देणारा महाविद्यालय किंवा विद्यापीठाचा घटक म्हणून विकसित होणे अपेक्षित आहे.

अश्याप्रकारे उच्च शिक्षण : २०३५ पर्यंत GER५०% पर्यंत वाढवणे उच्च शिक्षणासाह उच्च शिक्षणातील एकूण नोंदणी प्रमाण २०३५ पर्यंत २६.३ % (२०१८) वरून ५०% पर्यंत वाढवण्याचे उद्दिष्ट आहे. उच्च शिक्षण संस्थांमध्ये ३.५ कोटी नवीन जागा जोडल्या जातील असे नियोजन आहे.

## समग्र बहुविद्याशाखीय शिक्षण

या धोरणामध्ये व्यापक - आधारित, बहु-अनुशासनात्मक, लवचिक अभ्यासक्रम, विषयांचे क्रियाशील संयोजन, व्यावसायिक शिक्षणाचे एकत्रिकरण आणि योग्य प्रमाणीकरणासह अनेक प्रवेश आणि निर्गमन बिंदूंसह सर्वसमावेशक पदवी शिक्षणाची कल्पना केली आहे. यूजी एज्युकेशन ३ किंवा ४ वर्षांच्या कालावधी असू शकते, ज्यामध्ये एकापेक्षा जास्त एक्झिट पर्याय आणि योग्य प्रमाणपत्र असू शकते. उदाहरणार्थ, १ वर्षानंतर प्रमाणपत्र, २ वर्षानंतर प्रगत डिप्लोमा, ३ वर्षांनी बॅचलर पदवी आणि ४ वर्षांनी संशोधनासह बॅचलर वेगवेगळ्या HEI मधून मिळवलेली शैक्षणिक क्रेडिट डिजिटली साठवण्यासाठी एक शैक्षणिक बँक ऑफ क्रेडिटची स्थापना केली जाईल. जेणेकरून ते हस्तांतरित केले जाऊ शकतील आणि मिळवलेल्या अंतिम पदवीमध्ये मोजले जातील. IITs आणि IIM सह बहु-विद्याशाखीय शिक्षणाचे मॉडेल म्हणून स्थापन केली जातील. मजबूत संशोधन संस्कृती वाढविण्यासाठी आणि उच्च शिक्षणात संशोधन क्षमता निर्माण करण्यासाठी राष्ट्रीय संशोधन प्रतिष्ठानची सर्वोच्च संस्थान म्हणून स्थापना केली जाईल.

## नवीन शैक्षणिक धोरण : मूल्यांकन व सुधारणा

**NEP २०२०** सममितीय मूल्यांकनातून नित्य आणि फॉर्मेटिव्ह असेसमेंटकडे वळण्यात येईल, जे अधिक सक्षमतेवर आधारित आहे, शिक्षण आणि विकासाला चालना देणे आणि विश्लेषण, गंभीर विचार आणि संकल्पनात्मक स्पष्टता यासारख्या उच्च-क्रम कौशल्यांची चाचणी करणे. सर्व विद्यार्थी इयत्ता ३,५ आणि ८ मधील शालेय परीक्षांना बसतील ज्या योग्य प्राधिकरणाद्वारे घेतल्या जातील. इयत्ता १० आणि १२ च्या बोर्ड परीक्षा सुरू राहतील परंतु उद्दिष्ट म्हणून सर्वांगिण विकासाह पुनर्रचना केली जाईल. एक नवीन राष्ट्रीय मूल्यामापन केंद्र, PARKH (सार्वभौमिक विकासासाठी कार्यप्रदर्शन मूल्यांकन, पुनरावलोकन आणि विश्लेषण) एक मानक-सेटिंग संस्था म्हणून स्थापित केले जाईल.

## न्याय्य आणि सर्वसमावेशक शिक्षण

नवीन शैक्षणिक धोरण २०२० चे उद्दिष्ट जन्माच्या परिस्थितीमुळे किंवा पार्श्वभूमीमुळे कोणत्याही मुलाने शिकण्याची आणि उत्कृष्ट कामगिरी करण्याची संधी गमावू नये, हे सुनिश्चित करणे. सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या वंचित गटांवर (SEDGs) विशेष भर दिला जाईल. ज्यात लिंग, सामाजिक-सांस्कृतिक, आणि भौगोलिक ओळख आणि अपंग यांचा समावेश आहे. यामध्ये वंचित प्रदेश आणि गटांसाठी जेंडर कन्क्लुजन फंड आणि विशेष शैक्षणिक क्षेत्रांची स्थापना सामाविष्ट आहे. अपंग मुलांना मूलभूत अवस्थेपासून ते उच्च शिक्षणापर्यंतच्या नियमित शालेय प्रक्रियेत पूर्णपणे सहभागी होण्यास सक्षम केले जाईल, क्रॉस अपंगत्व प्रशिक्षण, संसाधन केंद्र, राहण्याची सोय, सहाय्यक

उपकरणे, योग्य तंत्रज्ञान-आधारित साधने आणि इतर सहाय्यक यंत्रणेसह शिक्षकांच्या समर्थनासह. त्यांच्या गरजा पूर्ण करण्यात येईल. प्रत्येक राज्य/जिल्ह्याला कला-संबंधित, करिअरसंबंधीत आणि खेळ-संबंधित क्रियाकलापांमध्ये सहभागी होण्यासाठ विशेष दिवसाच्या बोर्डिंग स्कूल म्हणून "बाल भवन्स" स्थापन करण्यासाठी प्रोत्साहित केले जाईल. मोफत शाळेच्या पायाभूत सुविधांचा उपयोग सामाजिक चेतना केंद्र म्हणून केला जाऊ शकतो. अश्या अनेक उपक्रमांचा या अंतर्गत समावेश केला जाणार आहे.

**विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्य**

समाजातील SC, ST, OBC आणि इतर सामाजिक व शैक्षणिक मागस मधील विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेला प्रोत्साहन देण्यासाठी प्रयत्न केले जातील. त्यात प्रामुख्याने शिष्यवृत्ती प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या प्रगतीचा पाठपुरावा, पालनपोषण आणि मागोवा घेण्यासाठी राष्ट्रीय शिष्यवृत्ती पोर्टलचा विस्तार केला जाईल. खाजगी शैक्षणिक क्षेत्रातील त्यांच्या विद्यार्थ्यांना मोठ्या संख्येने फ्री-शिप आणि शिष्यवृत्ती ऑफर करण्यासाठी प्रोत्साहित केले जाईल.

**मुक्त आणि दूरस्थ शिक्षण**

GER (Gross Enrollment Ratio) वाढवण्यात महत्वाची भूमिका बजावण्यासाठी याचा विस्तार केला जाईल. ऑनलाइन कोर्सेस आणि डिजीटल रिपॉझि टरीज, संशोधनासाठी निधी, सुधारित विद्यार्थी सेवा, MOOCs ची क्रेडिट-आधारित मान्यता इ. या सारख्या उपाययोजना, ते उच्च दर्जाच्या इन-क्लास प्रोग्राम्सच्या बरोबरीने असल्याची खात्री करण्यासाठी घेतले जातील.

**ऑनलाइन शिक्षण आणि डिजिटल शिक्षण**

ज्यावेळी आणि जेथे-जथे पारंपारिक आणि वैयक्तिक शिक्षण पद्धती शक्य नसेल, तेथे गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या पर्यायी पद्धतींसह सज्जता सुनिश्चित करण्यासाठी महामारी आणि साथीच्या रोगांच्या अलीकडील वाढीमुळे ऑनलाइन शिक्षणासस प्रोत्साहन देण्यासाठी सर्वसमावेशककक शिफारसींचा समावेश करण्यात आला आहे. शालेय आणि उच्च शिक्षण या दोन्हींच्या ई-शिक्षणाच्या गरजा पूर्ण करण्यासाठी MHRD मध्ये डिजीटल पायाभूत सुविधा, डिजीटल सामग्री आणि क्षमता वाढवण्याच्या उद्देशानें एक समर्पित तयार केले जाईल.

**शिक्षणात तंत्रज्ञान**

एक स्वायत्त संस्था, नॅशनल एज्युकेशनल टेक्नॉलॉजी फोरम (NETF), शिक्षण, मूल्यांकन, नियोजन, प्रशासन वाढविण्यासाठी तंत्रज्ञानाच्या वापरावर विचारांच्या मुक्त देवाणघेवाणीसाठी एक व्यासपीठ प्रदान करण्यासाठी तयार केले जाईल. वर्गातील प्रक्रिया सुधारण्यासाठी, शिक्षकांच्या व्यावसायिक विकासाला मदत करण्यासाठी, वंचित गटांसाठी शैक्षणिक प्रवेश वाढविण्यासाठी आणि शैक्षणिक नियोजन, प्रशासन आणि व्यवस्थापन सुव्यवस्थित करण्यासाठी तंत्रज्ञानाचे शिक्षणाच्या सर्व स्तरांमध्ये योग्य एकीकरण केले जाईल.

**प्रमुख निष्कर्ष :**

१) शालेय शिक्षणासह उच्च शिक्षणासाठी सर्व समावेशक समाज घटकांचा अंतर्भाव असणारी शिक्षण व्यवस्था धोरणांतर्गत तरतूद केलेली असली तरी शिक्षणासाठी मुलभूत, पायाभूत सुविधा कश्या उभारणार या संदर्भात स्पष्ट उल्लेख दिसून येत नाही .

२) नवीन शिक्षण प्रणालीमध्ये शासकीय हस्तक्षेप कमी करण्यात येऊन खाजगी संस्थाना अधिक पुढाकार घेण्यास प्रवृत्त केलेलं आहे ज्यामुळे सामाजिक न्यायाचे संतुलन धोक्यात येण्याची शक्यता आहे.

३) व्यवसाय व उद्योगस्नेही शिक्षण पद्धती विकसीत करण्यासाठी हे नविन शैक्षणिक धोरण उपयुक्त ठरणार असल्याचं भाकीत केलं जात असल तरी आपल्या देशातील सामाजिक संतुलन आणि राष्ट्रीय एकात्मकता कायम राहावे यासाठी सामाजिक मुल्ये शिक्षणात कमी करण्यात येऊ नयेत.

४) जुनी शिक्षण प्रणाली आणि नवीन प्रणाली यात जर विद्यमान समाजाच्या आकांक्षा पूर्ण करणाऱ्या तत्त्वांची सांगडे घालण्यात बदलवण्यात आली नाही तर पुन्हा लोकशाही चे रुपांतर झुंडशाही मध्ये होते.

५) नवीन शिक्षण प्रणाली लागू करण्याचा विचार शासन करीत असले तरी त्यास पूरक आणि अनुशांगिक सर्व पायाभूत सेवा व सुविधा आणि इन्फ्रास्ट्रक्चर अगोदर विकसीत होणे आवश्यक आहे.

**संदर्भ**

१. डॉ. रमेश पोखरिअल, (लोकसभेतील चर्चा - २०२०) शिक्षणमंत्री, भारत सरकार, नवी दिल्ली.

२. New Education report-२०२०, Central Education Ministry, Government of India.

३. https://pib.gov.in/PressReleasePage.aspx?PRID=१६४२०६४.

४. https://www.bytesofindia.com/newsdetails?NewsID=५५७५७०७२९५१५५९५४१८२.

५. https://marathisanhita.com/२०२२/१२/२३/new-education-dhoran/

6. https://www.education.gov.in/hi.